जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/३४८२/२०२०

प्रेसनोट                    दिनांक - २०/११/२०२०

तळवडे वाहतूक विभाग हद्दीतील महापारेषणच्या मनोरा क्र. ३४ टॉवर लाईन रोडने उंच वाहनांच्या वाहतूकीमुळे मनोरा क्र. ३४ धडकुन मनोराचे नुकसान झालेले आहेत.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त, वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि.२०/११/२०२० ते दि. ०४/१२/२०२० पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करून अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येईल.

## <u>तळवडे वाहतुक विभाग अंतर्गत</u>

१) २.३० मी. पेक्षा उंच वाहने टॉवर लाईनरोडने न जाता ज्योतिबा नगर मधुन इच्छित स्थळी जातील.

२) २.३० मी. पेक्षा उंच वाहने टॉवरलाईन चौकातुन डावी कडे टॉवर लाईनरोडने जाता ज्योतिबा नगर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे तळवडे वाहतुक विभाग अंतर्गत जाणाऱ्या २.३० मी पेक्षा उंच वाहनांना प्रवेश बंदी करणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

Shiremath

**(सुधीर हिरेमठ)** भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून,सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी <u>तळवडे</u> वाहतुक विभाग

४) कार्यकारी अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, पिंपरी चिंचवड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बंधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.